# कुलगुरू पदासाठी पुण्यातूनही इच्छुक

## ऑनलाईन अर्ज करण्याचा आज शेवटचा दिवस

**कोल्हापूर, ता. १ :** शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी इच्छुक असणाऱ्यांची यादी बरीच मोठी आहे. विद्यापीठातील अधिविभागातील प्राध्यापक, महाविद्यालयांचे प्राचार्य, खासगी विद्यापीठांमधील पदाधिकारी हे इच्छुक आहेतच. याशिवाय क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातूनही काही प्राध्यापक आणि अधिष्ठातांनी या पदासाठी अर्ज केले आहेत. यामध्ये प्रा. डॉ. संजय सोनवणे, प्रा. डॉ. अंजली कुरणे, प्रा. डॉ. विजय खरे यांनी या पदासाठी अर्ज केल्याचे समजते. दरम्यान, ऑनलाइन अर्ज करण्याचा आजचा (ता.२) शेवटचा दिवस आहे. मात्र, पोस्टाने अर्ज पाठवण्यासाठी शुक्रवार (ता. १०) पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा कार्यभार १७ जूनला संपला. त्यानंतर प्रभारी कुलगुरू म्हणून क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे सूत्रे देण्यात आली. तत्पूर्वी ३ जूनला नव्या कुलगुरूंची निवड करण्यासाठी शोध समिती स्थापन करून ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले. उद्या (ता. २) अर्ज करण्याचा अंतिम दिवस आहे. या पदासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील इच्छुकांनी अर्ज केले आहेतच; पण पुणे येथूनही काही अर्ज आल्याची माहिती सूत्रांनी दिली. यामध्ये आंतरविद्याशाखीय विभागाचे आधिष्ठाता प्रा. डॉ. संजय सोनवणे, मानव्य विज्ञान विभागाच्या अधिष्ठाता प्रा. डॉ. अंजली कुरणे, इंटरनॅशनल स्टडीज सेंटरचे प्रमुख प्रा. डॉ. विजय खरे यांचा समावेश आहे. याशिवाय शिवाजी विद्यापीठातून बायोकेमिस्ट्री अधिविभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. ज्योती जाधव, माजी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, पर्यावरणशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, स्कूल ऑफ नॅनो सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीचे प्रमुख प्रा. डॉ. पी. एस. पाटील, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. व्ही. जे. फुलारे, प्रा. डॉ. सोनकवडे. अर्थशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. ज्ञानदेव तळुले, प्रा. डॉ. पी. एस. कांबळे, प्रा. डॉ. जगन कराडे, प्रा. डॉ. विजय ककडे, प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील प्रा. डॉ. आर. व्ही. शेजवळ यांनी अर्ज केले आहेत.

# लॉकडाऊनमध्येही मुद्रित माध्यमेच विश्वासार्ह!

## शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता अध्यासनाचे सर्वेक्षण



प्रतिनिधी
कोल्हापूर

लॉकडाऊनच्या काळातही डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांपेक्षा मुद्रित माध्यमे अधिक विश्वासार्ह आहेत, अशी माहिती संशोधनातून पुढे आली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री कै. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्यावतीने केलेल्या ऑनलाईन सर्वेक्षणात मुद्रीत माध्यमांवरच सर्वाधिक विश्वास व्यक्त केला आहे. अध्यासनाच्या पी. जी. डिप्लोमा इन ऑनलाईन जर्नालिझम या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी हा सर्व्हे केला. अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली.

लॉकडाऊनच्या काळात विविध प्रसारमाध्यमांचा कशा पद्धतीने उपयोग होतो, याचा अभ्यास अध्यासनाच्यावतीने करण्यात आला. पारंपरिक, मुद्रीत, इलेक्ट्रॉनिक आणि वेब माध्यमांना वाचक, श्रोते-दर्शक आणि युजर्स कसा प्रतिसाद देतात, हे पाहणे अभ्यासाचे उद्दीष्ट होते. माध्यमांतून येणारी माहिती अधिक विश्वासार्ह वाटते, याची माहिती जाणून घेण्याचाही प्रयत्न करण्यात आला. लॉकडाऊनच्या काळात माध्यमांच्या वापरासंदर्भातील प्रश्नावली ऑनलाईन पद्धतीने भरून घेण्यात आली. महाराष्ट्रसह इतर राज्यातूनही काही उत्तरदात्यांनी याला प्रतिसाद दिला. ३०० हून अधिक जणांनी ही प्रश्नावली भरून दिली. प्रश्नावलीचे विश्लेषण केले असता, मुद्रीत माध्यमे सर्वाधिक विश्वासार्ह असल्याचे मत ६९.३ टक्के उत्तरदात्यांनी नोंदवले. १९.६ टक्के लोकांच्या मते इंटरनेट तसेच मोबाईलवरील माहिती विश्वासार्ह आहे. तर इलेक्ट्रॉनिक माध्यमातील माहिती विश्वासार्ह असते, असे मत ८.१ टक्के लोकांनी व्यक्त केले. तर ३ टक्के लोकांना पारंपरिक माध्यमे विश्वासार्ह वाटतात. याचाच अर्थ मुद्रीत माध्यमांची विश्वासार्हता इतर माध्यमांच्या तुलनेत कैकपटीने जास्त आहे.

लॉकडाऊनच्या काळात सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणात होत आहे. सोशल मीडियासाठी लोकांनी लॉकडाऊनच्या काळात पूर्वीपेक्षा जास्त वेळ दिला. लॉकडाऊनपूर्वी सोशल मीडियासाठी दिवसातील २ ते ४ तास वेळ देणाऱ्यांची संख्या २०.३ टक्के होती. पण लॉकडाऊन काळात ही संख्या वाढून ३९.५ टक्के झाली. ५५.७ टक्के लोक लॉकडाऊनमध्ये व्हॉट्सअ‍ॅपचा वापर करत असल्याच स्पष्ट झाले.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांचाही यावेळी अभ्यास करण्यात आला. ६३.२ टक्के लोक माहिती मिळविण्यासाठी मराठी वृत्तवाहिन्या पाहतात. स्थानिक भाषेतील माध्यमे वापरणे सोयीचे असल्याने बहुतेक लोक मराठी वृत्तवाहिन्या पसंत करत आहेत. लॉकडाऊनच्या काळात वृत्तवाहिन्या पाहण्यासाठी अधिक वेळ दिला जात आहे. इतर माध्यमांना वेळ देण्याचे प्रमाण वाढले असले तरी वस्तुनिष्ठ माहितीसाठी लोक मुद्रीत माध्यमांचाच आधार घेत असल्याचे या अभ्यासातून समोर आले आहे.

# कुलगुरुपदासाठी राऊत, शिर्केसह १७ जणांचे अर्ज

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरुपदासाठी बुधवारपर्यंत १७ जणांनी अर्ज केले आहेत. विद्यापीठाचे पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. पी. डी. राऊत, माजी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांचे 'ओएसडी' असणारे राजेंद्र सोनकवडे यांच्यासह मुंबई, पुणे विद्यापीठांतील प्राध्यापकांचा समावेश आहे. त्रिसदस्यीय शोधसमितीकडे ऑनलाईन अर्ज करण्याची आज, गुरुवारी अंतिम मुदत आहे. या अर्जाची प्रत सादर करण्यास दि. १० जुलैपर्यंत समितीने मुदतवाढ दिली आहे.

या समितीकडे 'ओएसडी' सोनकवडे, माजी प्र-कुलगुरु डॉ. शिर्के, पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. राऊत, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. पी. एस. पाटील, रसायनशास्त्र विभागाच्या प्रमुख डॉ. ज्योती जाधव, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. व्ही. जे. फुलारी, अर्थशास्त्राचे विभागप्रमुख डॉ. ज्ञानदेव

> या शोध समितीने कुलगुरुपदासाठीच्या ऑनलाईन अर्जाची प्रत टपालाने पाठविण्यास दि. १० जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे.
>
> **- आर. के. जैन, संपर्क अधिकारी**

कांबळे, विजय ककडे, समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे, कळे (जि. कोल्हापूर) येथील विठ्ठलराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब लाडगावकर, सांगलीतील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे, विवेकानंद संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, मुंबई विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक प्राचार्य डॉ. दिलीप पाटील, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय विभागाचे अधिष्ठाता डॉ. संजय सोनवणे, इंटरनॅशनल स्टडीज सेंटरचे प्रमुख डॉ. विजय खरे आणि मानव्य विज्ञान विभागाच्या अधिष्ठाता डॉ. अंजली कुरणे यांनी ऑनलाईन अर्ज सादर केले

# कुलगुरू निवड : अर्ज करण्याची मुदत आज संपणार

# इच्छुकांकडून भेटीगाठी सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या कुलगुरू पदासाठी अर्ज करण्याची मुदत २ जुलै रोजी संपत आहे. या पार्श्वभूमीवर इच्छुक उमेदवारांकडून भेटीगाठी सुरू झाल्या असून आपापल्या स्तरावर 'वजन' वापरून मोर्चेबांधणी सुरू झाली आहे. विद्यापीठातून माजी प्र-कुलगुरू, पर्यावरणशास्त्र विभाग, पदार्थविज्ञान विभाग, रसायनशास्त्र विभाग, अर्थशास्त्र विभाग प्राध्यापक यांच्यासह पुणे, मुंबई, सांगली, सातारा, सोलापूर येथील प्राध्यापक व प्राचार्यांनी अर्ज केले आहेत.

डॉ. देवानंद शिंदे यांच्या पदाचा कार्यकाल १७ जून रोजी संपला. नवीन कुलगुरू निवडीसाठी अर्ज प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. विद्यापीठ कायद्यानुसार ही निवड होणार आहे. त्यासाठी कुलपतींनी त्रिसदस्यीय शोध समिती नेमली आहे.



शिवाजी विद्यापीठातून...

या समितीने ३ जूनपासून ऑनलाईन आणि प्रत स्वरूपात अर्ज मागवण्यात सुरुवात केली आहे. ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत २ जुलैपर्यंत आहे. या पार्श्वभूमीवर प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, पर्यावरणशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. पी. डी. राऊत, अर्थशास्त्र विभागाचे डॉ. विजय ककडे, डॉ. व्ही. जे. फुलारी, डॉ. एस. एस. चव्हाण, सांगलीतील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे प्राचार्य डी. जी. कणसे, विवेकानंद शिक्षण संस्थेचे सहसचिव प्राचार्य डॉ. आर. व्ही. शेजवळ, डॉ. दिलीप पाटील-मुंबई, सोलापूर विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. एस. आय. पाटील यांच्यासह पुणे विद्यापीठातील नऊ जणांनी अर्ज केल्याची माहिती समजते.

कुलगुरू पदासाठी ई-मेल द्वारे अर्ज करण्याची मुदत २ जुलैपर्यंत आहे. ती कायम ठेवून कुलगुरू शोध निवड समितीने हार्ड कॉपी टपालाने पाठविण्यास कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर १० जुलैपर्यंत मुदतवाढ दिली आहे. याबाबतचे पत्र कुलगुरू निवड प्रक्रियेचे संपर्क अधिकारी केंद्रीय मनुष्यबळ संचालनालयातील अतिरिक्त संचालक आर. के. जैन यांनी बुधवारी विद्यापीठाला पाठवले आहे.

# विद्यापीठात वसंतराव नाईक यांना अभिवादन

कोल्हापूर : राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा कृषिक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांची जयंती शिवाजी विद्यापीठात बुधवारी साजरी करण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या हस्ते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, नेहरु अभ्यास केंद्राचे समन्वयक डॉ. रवींद्र भणगे उपस्थित होते.

# विद्यापीठातर्फे क्रीडा वेबिनार

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग आणि डीआरके कॉमर्स कॉलेज यांच्यातर्फे व कोल्हापूर जिल्हा बास्केटबॉल असोसिएशन यांच्या सहकार्याने रविवारी (दि. ५) आणि सोमवारी (दि. ६) आंतरराष्ट्रीय वेबिनार होणार आहे.

'कोविड-१९ साथीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य, शारीरिक शिक्षण आणि क्रीडा' असा वेबिनारचा विषय आहे. पालकमंत्री सतेज पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी दुपारी चार वाजता या वेबिनारचे उद्घाटन होईल. त्यानंतर डॉ. गोर्डाना मार्कोविक (सर्बिया), वालिद मार्सेल (लेबेनॉन), ब्रॉन्को सिसिक (बेलग्रेड-सर्बिया), बॉंग पास्कल (फिलिपाइन्स) हे तज्ज्ञ मार्गदर्शन करतील.

सोमवारी या क्रीडा वेबिनारचा समारोप होणार असून, समारोपाच्या सत्रामध्ये कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. विश्वनाथ मगदूम, प्राचार्य डॉ. व्ही. ए. पाटील सहभागी होतील, अशी माहिती क्रीडा अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी दिली.